// सा विद्या या विमुक्तये //
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)
**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**
"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)
Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325
Website : srtmun.ac.in
e-mail : aff.srtmun@gmail.com

१.शासकीय/अशासकीय महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन/पूनर्मूल्यांकन मानांकन करणे बाबत.

२. शासकीय/अशासकीय,व्यावसायीक महाविद्यालयांच्या एनबीए मुल्यांकन (NBA Accreditation)व एनबीए पुनर्मूल्यांकन(NBA Reaccreditation) करणे बाबत.

## :: परिपत्रक ::

संदर्भ :–१. मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे–१ यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि–३/६७८, दि. २५.०१.२०२३.
२. मा. प्र.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र क्र. जा.क्र.: विकाऔ/शिक्षण /२०२३/५०७, दि. २७.०१.२०२३.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ०१ अन्वये प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांच्या मा. अध्यक्ष व प्राचार्य यांना कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्याकंन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६ (ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पूनर्मूल्यांकनाची तरतूद नमुद केली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र. ५२८०/२०१५ मधील दि. १६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केलेले आहे.

तेंव्हा सर्व महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि. ३१.०३.२०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. करिता या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल, कृपया याची नोंद घेण्यात यावी.

कृपया मागे पहा

तसेच संदर्भीय पत्र क्रं. ०२ अन्वये प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व व्यावसासीक अभ्यासक्रमांच्या शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांच्या मा. अध्यक्ष/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, एनबीए मुल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुनर्मूल्यांकन (NBA Reaccreditation) करने बाबत सूचना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम मधील कलम ११० मधील पोटकलम ४ नूसार, '' महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्विकृती किंवा यथास्थिती पुनर्रअधिस्विकृती मिळणेसाठी पात्र किंवा अपेक्षित असेल असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्विकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्विकृतीच्या आवश्यकतांची पुर्तता करण्यात कसूर करीत असेल तेंव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही'' अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधित महाविद्यालायचे एनबीए मुल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुनर्मूल्यांकन (NBA Reaccreditation) प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

नवीन शिक्षण धारेणामध्ये (NEP 2022) तसेच आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या धोरणामध्ये दर्जात्मक शिक्षण आणि दर्जेदार शैक्षणिक संस्थांना देण्यात आलेले प्राधान्य विचारात घेता संस्थांनी मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेणे अत्यावश्यक आणि अपरिहार्य आहे. त्यासाठी आपल्या संस्थेतील एन.बी.ए. करीता पात्र अभ्यासक्रमांना एनबीए मुल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुनर्मूल्यांकन (NBA Reaccreditation) पुढील सहा महिण्यांत प्राप्त करुन घेण्यात यावे. अन्यथा संदर्भीय शासन पत्र/शासन निर्णयात नमुद केल्यानुसार शासन नियमानुसार व प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी.

तसेच सोबत जोडलेल्या एक्सेल शीट व गुगल फॉर्ममध्ये संस्थेतील अभ्यासक्रम निहाय माहिती भरण्यात यावी. व सदरील माहिती संबंधित कार्यालयास सादर करण्यात यावी व त्याची एक प्रत या विभागास सादर करावी.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळवार affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२२–२०२३/1399
दिनांक :– ०३.०२.२०२३

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. प्राचार्य, व्यावसायीक व अव्यावसायीक अभ्यासक्रमांचे सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळवार Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.